नियमीत दिवाणी दावा क्र. २५/२०१४
गुलाब वि. उषा
निशाणी क्र. ६३

**शपथेवर उलटतपास सुरु** :-
**उलटतपास प्रतिवादी क्र. १ व २ तर्फे ॲड. के.एम. नवरे साहेब यांच्यामार्फत** :-

मी रामटेक कोर्टात सन-१९८६ पासून वकिलांचे अटर्नी म्हणून काम करीत आहे. मी सुरुवातीला वामनराव सीताराम गायकवाड या वकिलसाहेबांकडे काम करीत होतो. सुरुवातीला मी माझे मूळ गांव हेटीटोला या गांवी राहत होतो. त्यानंतर मी हरदास वकील साहेबांकडे काम केले. त्यानंतर आता मी एम.व्ही. येरपुडे यांच्याकडे काम करीत आहे. माझ्या शपथपत्रात माझा व्यवसाय हा रोजमजुरी हा लिहीलेला आहे, तो खोटा आहे. वादी गुलाब यांना दोन भाऊ व दोन बहिणी होत्या. वादी गुलाब याचा लहान भाऊ भिमराव हा मयत झाला आहे. वाद घराचे छत एकच होते याबाबत मी कागदोपत्री पुरावा पाहिलेला नाही. वाद घराचे छत एकच असल्याबाबत नगरपरिषदेचा कागद किंवा त्या घराचा फोटो याबाबत मला माहिती नाही. मी वाटणीचा कागद पाहिलेला नाही. छोटु कोठे हा प्रतिवादी क्र. १ हिचे वडील होते. छोटु कोठे यांच्या पत्नीचे नाव काय होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की, छोटु कोठे व त्यांची पत्नी हे दोघे मिळून वाद घरात राहत होते. हे मला माहीत नाही की, प्रतिवादी उषा हिचा जन्म वाद घरात झाला होता किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, उषा हिचे लग्न वाद घरात झाले आहे. हे म्हणणे खरे आहे की, गुलाब व छोटु यांचे राहणे व खाणे-पिणे वेगळे होते. हे मला माहीत नाही की, छोटु कोठे याने त्याच्या घराच्या पूर्व भागात हद्दीची भिंत सन-२००३ साली चालू केले होते. हे मला माहीत नाही की, त्यावेळी माझे साळे यांनी छोटु कोठे व त्यांच्या पत्नीला मारहाण केली होती. हे मला माहीत नाही की, त्यावेळी छोटु कोठे याने माझ्या दोन्ही साळ्याच्या विरुद्ध पोलीस स्टेशनला तक्रार दिली होती. हे मला माहीत नाही की, छोटु कोठे याने स्थानिक आमदार याच्या सांगण्यावरुन व छोटुच्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन रामटेक येथे माझ्या

साळ्याच्या विरुद्ध तक्रार दिली होती. हे मला माहीत नाही की, छोटु कोठे यांच्यामार्फत विधीज्ञ एम.व्ही. येरपुडे यांनी माझ्या साळ्यांना नोटीस पाठविली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे दोन्ही वादी हे छोटु कोठे यांना जेवण–खावण देऊन त्याचा औषधोपचार करीत होते, हे माझे म्हणणे खरे नाही. हे म्हणणे खरे नाही की, छोटु कोठे याच्या पत्नीला माझे साळे वादी हे मारपीट करीत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे छोटु कोठे याची पती मयत झाली. छोटु कोठे हा सीतापुर येथे मयत झाला. छोटु कोठे हा कोणत्या वर्षी मयत झाला हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, छोटु कोठे याला त्याच्या मुलीने सीतापुर येथे त्याच्या म्हातारपणी सांभाळण्यासाठी नेले होते.

०२) हे म्हणणे खरे आहे की, वाद घर पडले आहे. हे म्हणणे खरे आहे की, वाद घर ही सध्या खुली जागा आहे. वाद घराची लांबी व रुंदी तसेच क्षेत्रफळ मला सांगता येणार नाही. संदीप क्षिरसागर हा माझ्या साळ्याच्या घरी कोणत्या वर्षी कोणत्या तारखेला व कोणत्या महिन्यात आला होता, हे मला सांगता येणार नाही. उषा हिने संदीप क्षिरसागरसोबत वाद मिळकतीचा खरेदीचा व्यवहार केल्याचे मी स्वतः पाहिलेले नाही. तो खरेदीचा व्यवहार हा मी लिहीलेला नाही व माझी त्याच्यावर स्वाक्षरी नाही. संदीप क्षिरसागर याने माझ्या साळ्याला धमकी दिल्याबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दिली नव्हती व मी स्वतःदेखील सदरची तक्रार लिहून दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, लोक माझ्याकडे पोलीस स्टेशनला देण्यासाठी तक्रारी लिहून मागतात व मी लिहून देतो. हे म्हणणे खरे नाही की, मला वाद मिळकतीविषयी काहीच माहीत नसताना मी खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**<u>प्रश्न</u>** : तुम्ही गायकवाड वकीलांकडे अटर्नी म्हणून काम करीत असताना हेटीटोला या गांवी राहत असताना मी हेटीटोला, मनसर, पटगोवारी व माईन्स या भागातील काही भाग येथील लोकांकडून त्यांना दुप्पट पैसे परत देतो असे म्हणून त्यांच्याकडून पैसे गोळा केले होते. त्यावेळी मी लोकांचे पैसे परत न दिल्याने माझ्याविरुद्ध लोकांनी पोलीस स्टेशन रामटेक येथे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४२०

अन्वये तक्रार दिली होती. (या प्रश्नाला वादीचे विधीज्ञ श्री. पी.बी. बांते साहेब यांनी हरकत घेतली. सदरची हरकत नाकारुन प्रतिवादीच्या विधीज्ञांना उलटतपासामध्ये सदरचा प्रश्न विचारण्यास परवानगी देण्यात आली.)

**उत्तर** : हे खोटे आहे.

०३) हे म्हणणे खरे नाही की, वरील व्यवहारामुळे माझ्याविरुद्ध केस दाखल झाली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी ज्या वकिलांकडे काम करीत होतो त्यावेळी मला गायकवाड वकीलांनी त्यांच्याकडे काम करण्यास मनाई केली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल करुन आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.
फेरतपास काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत — माझे समक्ष,

रामटेक. — (एच.एस.सातपुते)
दिनांक : २३/०२/२०२३. — दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक